क्रमांक : १२२९ /क-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक: २४ जानेवारी, २०२२.

**:: कार्यालयीन आदेश ::**

या सचिवालयातील तात्पुरत्या पदोन्नतीमुळे / सेवानिवृत्तीमुळे रिक्त झालेल्या एस-१४ : ३८६००-१२२८०० या वेतनस्तरातील **"निम्नश्रेणी लघुलेखक"** या पदावर लिपिक-टंकलेखक संवर्गातील खालील कर्मचाऱ्यांची दिनांक ३ जानेवारी, २०२२ रोजीपासून नियमित स्वरूपातील निम्नश्रेणी लघुलेखक म्हणून तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीने नियुक्ती करण्यात आली आहे :-

| अ.क्र. | लिपिक-टंकलेखकांचे नाव |
|---|---|
| १. | श्री.सु.सु.मोरे, लिपिक-टंकलेखक |
| २. | श्री.वि.चं.कासले, लिपिक-टंकलेखक |
| ३. | श्री.वि.के.पार्टे, लिपिक-टंकलेखक |
| ४. | श्रीमती स्वा.रु.गायकवाड, लिपिक-टंकलेखक |

२. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्रमांक २७९७/२०१५ मध्ये दिनांक ४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन-१६-ब यांच्या शासन निर्णय दिनांक ७ मे, २०२१ मधील तरतुदीनुसार पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दिनांक २५ मे, २००४ च्या स्थितीनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून भरण्यात येत आहेत.

३. संबंधित कर्मचाऱ्यांना **"निम्नश्रेणी लघुलेखक"** पदावरील पदोन्नती खालील अटींच्या अधिन राहून देण्यात येत आहे :-

(अ) निम्नश्रेणी लघुलेखक संवर्गातील पदोन्नती तात्पुरत्या स्वरुपात प्रशासकीय निकड म्हणून देण्यात येत आहे.

(ब) या तात्पुरत्या पदोन्नतीमुळे संबंधित कर्मचाऱ्यांना नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

(क) निम्नश्रेणी लघुलेखक संवर्गातील सदर पदोन्नती मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ च्या अधीन राहून करण्यात येत आहे.

आदेशानुसार,

**(सुभाष नलावडे)**
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**प्रति,**

**उपरोक्त सर्व संबंधित लिपिक-टंकलेखक.**

**प्रतिलिपी :-**

१) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.
२) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
३) मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
४) या सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष.
५) कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
६) क-२ (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
७) वैयक्तिक नस्ती.
८) निवडनस्ती.